जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक १९.०८.२०२५**

'' गणेशोत्सव २०२५ बाबत समन्वय बैठक''

दिनांक १८/०८/२०२५ रोजी १५.०० वाजता कल्याण पश्चिम येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, कल्याण आणि कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (KDMC) यांच्या संयुक्त विद्यमाने २०२५ मध्ये साजरा होणाऱ्या गणेशोत्सवाबाबत एक महत्त्वपूर्ण समन्वय बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर समन्वय बैठकीत कल्याण डोंबिवली मधील खाजगी व सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाचे पदाधिकारी, मेळा संघाचे पदाधिकारी, गणेश भक्त, पोलीस मित्र, शांतता कमिटी सदस्य, पत्रकार बंधू भगिनीं तसेच सुमारे ४०० ते ५०० नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. गणपती मंडळांना उत्सवामध्ये येणाऱ्या अडचणी बाबत शासनातील तसेच सर्व अधिकाऱ्यांनी त्यांच्या विभागाशी संबंधित विषयाचे निरसन केले. तसेच सदर समन्वय बैठकीत ध्वनी प्रदूषणाचे दुष्परिणाम या विषयावर एक लघुपट तयार करून दाखविण्यात आला व पॉवरपॉइंट प्रेझेंटेशन (वीडियो viceover) द्वारे तयार करून दाखवण्यात आले. डीजे मुक्त उत्सव, कायद्याची माहिती, मा.सुप्रीम कोर्टाच्या मार्गदर्शक सुचना, शासनाची नियमावली इत्यादी बाबत सर्व गणेश मंडळांना सविस्तर माहिती देण्यात आली.

सदर बैठकीसाठी श्री.अभिनव गोयल, केडीएमसी आयुक्त, श्री.संजय जाधव, अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग कल्याण, श्री.पंकज शिरसाठ, पोलीस उप आयुक्त, वाहतूक शाखा, ठाणे, श्री.विश्वास गुजर, प्रांत अधिकारी, श्री.सचिन शेजाल, तहसीलदार, उल्हासनगर तसेच महानगरपालिकेचे अधिकारी, पोलीस विभागातील अधिकारी/अंमलदार हजर होते.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर